—: प्रेस नोट :— दिनांक : १६.०३.२०२२

| | |
|---|---|
| कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री.संतोष सुधाकर केंन्द्रे, वय २९ वर्ष, व्यवसाय — नोकरी, पद — फायरमन, अग्नीशामक दल, महानगर पालिका अमरावती, वर्ग—४ रा. केकतसारणी ता.केज जि.बीड<br>२) श्री.गोविंद रामचंद्र घुले, वय ३४ वर्ष, व्यवसाय — नोकरी, पद — फायरमन, अग्नीशामक दल,महानगर पालिका अमरावती, वर्ग—४ रा.समता नगर जिरेवाडी ता.परळी जि.बिड.<br>३) श्री.गौरव अशोकरराव दंदे, वय — २८ वर्ष, व्यवसाय — नोकरी, पद — फायरमन, अग्नीशामक दल, महानगर पालिका अमरावती, वर्ग—४ रा. आखतवाडा पो.अपोती खुर्द ता.जि.अकोला.<br>४) श्री.सुरज विजय कांडलकर, वय ३४ वर्ष, धंदा — खाजगी कंत्राटदार (फायर सर्विसेस,) रा. संन्मती कॉलनी, शेगांव रोड, अमरावती खाजगी व्यक्ती |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाच रक्कम | १५,०००/— रूपये |
| घटनास्थळ | अग्नीशाम दल कार्यालय, महानगरपालीका अमरावती जि.अमरावती. |
| घटना तारीख व वेळ | दि. १६/०३/२०२२ चे १६.१० ते १७.२० वा. दरम्यान |

**थोडक्यात माहिती :—** यातील तक्रारदार यांनी दिनांक १६/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती येथे तक्रार दिली की, '' डॉ. अनुभुती चंद्रशेखर पाटील यांचे वतीने इच्छामणी हॉस्पीटल, कठोरा नाका, अमरावती येथे केलेल्या फायर इंस्टॉलेशन कामाची N.O.C देण्याकरीता अग्नीशमन विभाग, कार्यालय, अमरावती येथील फायरमन श्री.संतोष केंद्रे हे श्री. सुरज कांडलकर यांचे मार्फतीने १५,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत सविस्तर स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीची घडलेल्या परिस्थितीनुसार पंचासमक्ष दिनांक १६/०३/२०२२ व दिनांक १७/०३/२०२२ रोजी पडताळणी केली असता अग्नीशमन विभाग, कार्यालय अमरावती येथील फायरमन श्री.केंद्रे यांनी डॉ. अनुभुती चंद्रशेखर पाटील यांचे इच्छामणी हॉस्पीटल, कठोरा नाका, अमरावती येथे केलेल्या फायर इंस्टॉलेशन कामाची N.O.C देण्याकरीता १५,०००/— रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. तसेच खाजगी इसम श्री.सुरज कांडलकर यांनी लाच रक्कम देण्याकरीता प्रोत्साहन दिले. तसेच दिनांक १७/०३/२०२२ रोजी पंचासमक्ष सापळा कार्यवाही आयोजित केली असता आरोपी क्रमांक १ श्री.संतोष केंद्रे यांनी सदर १५,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारून आरोपी क्रमांक २) श्री. गौरव दंदे व आरोपी क्रमांक ३) श्री.गोंविद घुले यांना दिली. सदरची लाच रक्कम आरोपी क्रमाक ३ श्री. घुले यांचेकडुन ताब्यात घेण्यात आली. वरुन नमुद चारही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यावरून नमुद चारही आरोपीतांन विरूध्द पो.स्टे.सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री. विशाल गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक श्री. अरूण सावंत व पोलीस उप अधीक्षक, घटक प्रमुख श्री. संजय महाजन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री.किशोर म्हसवडे व म.पो.हवा.माधूरी साबळे, ना.पो.कॉ.विनोद कुंजाम,युवराज राठोड व वाहन चालक सपोफौ.बारबुध्दे यांनी पार पाडली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.

टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी क्रमांक — ०७२१—२५५२३५५, २५५३०५५.

(किशोर म्हसवडे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अमरावती

Scanned with CamScanner